जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर, नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या महाविद्यालय (BSc Nursing) स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनयुआर २०२०/प्र.क्र.१०४/२०/शिक्षण-१
९ वा मजला, गो.ते.रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक:- २६. ०२.२०२४.

प्रस्तावना:-

राज्यात व देशामध्ये होणारा संसर्गजन्य आजाराचा फैलाव विचारात घेऊन परावैद्यकीय अभ्यासक्रमामध्ये आमूलाग्र बदल करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी आरोग्य विज्ञानाच्या विविध क्षेत्रांमध्ये पदविका अभ्यासक्रम सुरु करुन शुश्रुषेशी निगडीत शाखांना प्रोत्साहन व प्राधान्य देण्याचे शासनाने योजिले आहे. त्यानुषंगाने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये परिचर्या अभ्यासक्रम महाविद्यालय (Bsc Nursing) सुरु करणे आवश्यक आहे.

२. शासकीय रुग्णालयांमध्ये उपचारार्थ येणाऱ्या रुग्णांना शुश्रृषा सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर, नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या पदवी महाविद्यालय (BSc Nursing) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर प्रस्तावास दिनांक १४.०२.२०२४ रोजी मा. मंत्रिमंडळाची मान्यता प्राप्त झाली असून त्यानुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१. जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर, नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न प्रत्येकी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय परिचर्या पदवी महाविद्यालय (BSc Nursing) स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

22/05/2025

२. जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज), कोल्हापूर, नंदुरबार व गोंदिया या ७ शासकीय परिचर्या पदवी महाविद्यालयांकरिता विवरणपत्र-"अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रथम चार वर्षासाठी सुमारे रु. २०६.८५ कोटी (अनावर्ती खर्च रु. १६६.५३ कोटी व आवर्ती खर्च रु. ४०.३२ कोटी) इतका निधी उपलब्ध करुन त्याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पाचव्या वर्षापासून आवर्ती खर्चासाठी प्रतिवर्ष सुमारे रू.१६.३४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन त्याप्रमाणे खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

३. नंदुरबार व गोंदिया येथील शासकीय परिचर्या महाविद्यालयांसाठी "Scheme for augmenting Nursing Education- Establishment of new Colleges of Nursing (CON) in co-location with Medical Colleges" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत प्रति परिचर्या महाविद्यालय रुपये १० कोटी इतका निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. त्यापैकी केंद्र शासनाचे दायित्व ६० टक्के प्रमाणे रुपये ६ कोटी व राज्य शासनाचे दायित्व ४० टक्के प्रमाणे ४ कोटी इतके असेल. भारतीय परिचर्या परिषदेच्या निकषांनुसार बांधकाम, फर्निचर, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ व दैनंदिन आवर्ती खर्च इ.साठी प्रति परिचर्या महाविद्यालय रुपये ३२.९७ कोटी (दोन संस्थासाठी एकूण अंदाजे निधी रू. ६५.९४ कोटी) आवश्यक असून उपरोक्त नमूद केंद्र पुरस्कृत योजनेतून उपलब्ध होणाऱ्या निधीची तरतूद वगळून उर्वरित निधी उपलब्ध करुन देऊन खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

४. जळगाव, लातूर, बारामती, सांगली (मिरज) व कोल्हापूर येथील शासकीय परिचर्या पदवी महाविद्यालयांसाठी भारतीय परिचर्या परिषदेच्या निकषांनुसार बांधकाम, फर्निचर, यंत्रसामुग्री, मनुष्यबळ व दैनंदिन आवर्ती खर्च इ.साठी अंदाजे रु. १४०.९१ कोटी इतका खर्च अपेक्षित असून आवश्यक निधी उपलब्ध करुन देऊन खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, आवश्यकतेनुसार वेळोवेळी पूरक मागणीद्वारे निधी उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५. सदर सात महाविद्यालयांसाठी विवरणपत्र-"ब" मध्ये दर्शविल्याप्रमाणे विविध संवर्गातील पदांची उच्चस्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने पदनिर्मिती करण्यास आणि पदे भरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय, नियोजन विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.१५२/नियो/शिकाना, दिनांक २०.१२.२०२३ व वित्त विभागाचे अनौपचारीक संदर्भ क्र.१७/व्यय-१३, दिनांक



22/05/2025 10:3

०८.०१.२०२३ अन्वये प्राप्त अभिप्रायाच्या अनुषंगाने आणि मा. मंत्रिमंडळाच्या दि.१४.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०२२६१५०६२०४११३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, 2.5.4.20=09df106c443b4977e7463338fa58f736fdb4fe137863b178345a5ead34dbfb12, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA337889880D6C567C29D025934340956DF, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2024.02.26 19:16:55 +05'30'

(अजित सासुलकर)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राज्यपाल सचिवालय, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई यांचे सचिव, विधान भवन, मुंबई
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (वै.शि.), महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
९. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधानभवन, मुंबई
१०. सचिव, आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार,निर्माण भवन, नवी दिल्ली
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
१२. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
१४. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
१५. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
१६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
१७. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

१८. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट-४००००१.

१९. सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, शासकीय तंत्रज्ञान इमारत, ३०५, ३ रा मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

२०. जिल्हाधिकारी, (जळगांव/ लातूर/ बारामती/ सांगली (मिरज)/ कोल्हापूर / नंदुरबार/ गोंदिया)

२१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १ / २ महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर

२२. जिल्हा कोषागार अधिकारी, (जळगांव/ लातूर/ बारामती/ सांगली (मिरज)/ कोल्हापूर/ नंदुरबार/ गोंदिया)

२३. जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, (जळगांव/ लातूर/ बारामती/ सांगली (मिरज)/ कोल्हापूर / नंदुरबार/ गोंदिया)

२४. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व परिचर्या महाविद्यालये

२५. प्रबंधक, महाराष्ट्र परिचर्या परिषद, मुंबई

२६. सर्व सह सचिव/उपसचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

२७. कक्ष अधिकारी (शिक्षण-२/ परिचर्या) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

२८. निवडनस्ती (शिक्षण-१)



22/05/

शासन निर्णय क्रमांका एमईडी २०२०/प्र.क्र.१०४/२०/शिक्षण १, दि. २६.०२.२०२४ सोबतचे सहपत्र.

## विवरणपत्र "अ"

(रुपये कोटी)

| क्र. | खर्चाचा तपशिल | प्रथम वर्ष | द्वितीय वर्ष | तृतीय वर्ष | चतुर्थ वर्ष | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इमारत व बांधकाम (लातूर वगळून) | ४४.९८ | ३७.४८ | ३१.१९ | २९.९९ | १४३.६४ |
| २ | यंत्रसामुग्री | २.१० | २.१० | २,१० | २.१० | ८.४० |
| ३ | फर्निचर | २.१० | २.१० | २.१० | २.१० | ८.४० |
| ४ | वाहन | २.८० | ०,०० | ०,०० | ०,०० | २.८० |
| ५ | पुस्तके | ०.६९ | ०.६८ | ०.६८ | ०.६८ | २.७३ |
| ६ | संगणक | ०.५६ | ०,०० | ०,०० | ०,०० | ०.५६ |
| | **एकुण अनावर्ती खर्च** | **५३.२३** | **४२.३६** | **३६.०७** | **३४.८७** | **१६६.५३** |
| ६ | अधिकारी व कर्मचारी वेतन | ३.३६ | ६.५० | ९.६० | १४.८४ | ३४.३० |
| ७ | दैनंदिन आवर्ती खर्च | १.५२ | १.५० | १.५० | १.५० | ६.०२ |
| | **एकुण आवर्ती खर्च** | **४.८८** | **८.००** | **११.१०** | **१६.३४** | **४०.३२** |
| **एकुण (अनावर्ती व आवर्ती खर्च)** | | **५८.११** | **५०.३६** | **४७.१७** | **५१.२१** | **२०६.८५** |

## विवरणपत्र "ब"

(रुपये कोटी)

| अ.क्र | संवर्ग | | एकुण खर्च प्रति संस्था | एकुण खर्च ७ संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | वर्ग-१ | पदे | ७ | ४९ |
| | | खर्च | ०.७६ | ५.३२ |
| २ | वर्ग-२ | पदे | ७ | ४९ |
| | | खर्च | ०.६० | ४.२० |
| ३ | वर्ग-३ | पदे | ३८ | २६६ |
| | | खर्च | २.९५ | २०.६५ |
| ४ | वर्ग-३ (काल्पनिक पदे) बाह्यस्रोत | पदे | ६ | ४२ |
| | | खर्च | ०.१६ | १.१२ |
| ५ | वर्ग-४ (कंत्राटी) | पदे | २४ | १६८ |
| | | खर्च | ०.४३ | ३.०१ |
| | **एकूण** | **पदे** | **८२** | **५७४** |
| | | **खर्च** | **४.९०** | **३४.३०** |



22/05/2025